जावक क्रमांक :-५०६/२०१८
पोलीस कल्याण शाखा,ठाणे ग्रामीण
दिनांक :२५/०६/२०१८

प्रती,

मा.पोलीस महासंचालक ,
महाराष्ट्र राज्य मुंबई

विषय :- ठाणे ग्रामीण घटकातील पोलीस कल्याण सप्ताह अहवाल बाबत.

संदर्भ :- मा.पोलीस महासंचालक,म.रा.मुंबई यांचेकडील क्र.पोमसं/२८-अे/४९३७/मपोकनिस बैठक/४३९/०५ मुंबई दि.०९/०५/२०१८

महोदय,

वरील विषय व संदर्भान्वये सविनय सादर की, ठाणे ग्रामीण जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेमध्ये पोलीस कल्याण योजने बाबत जागरुकता निर्माण होण्याकरीता दि.०१/०६/२०१८ ते दि.०७/०६/२०१८ रोजीचे दरम्यान पोलीस कल्याण सप्ताह साजरा करण्यात आला आहे. पोलीस कल्याण सप्ताहात पोलीस कल्याण योजनेची अदयावत माहीती असलेली पुस्तीका तयार करुन सर्व पोलीस स्टेशन, शाखा व मुख्यालयाचे ठिकाणी वाटप करण्यात आली आहे. तसेच सर्व पोलीस स्टेशन मध्ये व मुख्यालयाच्या ठिकाणी हजेरीच्या वेळी पोलीस कल्याण योजनांची माहीती पुस्तीकेचे वाचन करण्यात आले आहे.

१)दि.०१/०६/२०१८ रोजी पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुंटुबीया करीता, चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर चित्रकला स्पर्धे मध्ये १० स्पर्धकांनी भाग घेतला होता.

२)दि.०२/०६/२०१८ रोजी पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुंटुबीया करीता, रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर रांगोळी स्पर्धे मध्ये ०७ स्पर्धकांनी भाग घेतला होता.

३)दि.०३/०६/२०१८ रोजी पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुंटुबीया करीता, निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर निबंध स्पर्धे मध्ये १२ स्पर्धकांनी भाग घेतला होता.

४)दि.०४/०६/२०१८ रोजी ४५ वर्षे वयावरील २७ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची वैदकीय तपासणी करण्यात आली आहे.

:-दि.०४/०६/२०१८ रोजी गणेशपुरी उपविभागातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता भिवंडी पोलीस ठाणेचे हददीत युनीकेअर हॉस्पीटल,घाटकोपर मुंबई यांचेवतीने आरोग्य शिबीर आयोजीत करण्यात आले होते. सदर शिबीराचा लाभ ०३ अधिकारी व २६ कर्मचारी यांनी घेतला.

५) दि.०५/०६/२०१८ रोजी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता सिव्हील हॉस्पीटल, ठाणे (व्यसन मुक्ती विभाग) यांचेवतीने तंबाखु व्यसन मुक्ती शिबीर आयोजीत करण्यात आले होते.

६)दि.०६/०६/२०१८ रोजी शहापूर उपविभागातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता लायंन्स क्लब शहापुर व दिव्यदृष्टी चॅरीटेबल ट्रस्ट संचालीत शहापुर यांचेवतीने नेत्र तपासणी व आरोग्य शिबीर आयोजीत करण्यात आले होते. सदर शिबीराचा लाभ ०४ अधिकारी व १५ कर्मचारी यांनी घेतला.
दि.०६/०६/२०१८ रोजी ठाणे ग्रामीण मुख्यालयाच्या ठिकाणी व शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता फोर्टीज हॉस्पीटल,मुलुंड मुंबई यांचेतर्फे आरोग्य शिबीर, व नेत्र तपासणी, शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. एकुण १७५ पोलीस अधिकारी,कर्मचारी व त्यांचे कुटुंबीयांनी सदर आरोग्य शिबीराचा लाभ घेतला आहे.

७)दि.७/०६/२०१८ रोजी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकणभवन नवीमुंबई यांचेवतीने १० वी, व १२ वी, गुणवंत विदयार्थींचा सत्कार,केला. तसेच पोलीस कल्याण योजनेतंर्गत देण्यात येणा-या पदव्यूत्तर ०२ विदयार्थी यांना अनुदान देण्यात आले., सदर सत्कार कार्यक्रमात १० वी ०१ गुणवंत विदयार्थींचा १२ वी १३ विदयार्थी व पदव्यूत्तर ०२ विदयार्थी व रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा,चित्रकला स्पर्धा सहभागी झालेल्या पोलीस कर्मचारी व पोलीस पाल्यांना, प्रमाणपत्र व ट्राफी देवुन सत्कार करण्यात आला. सविनय सविस्तर अहवाल सादर करीत आहोत.यासोबत पोलीस कल्याण सप्ताहाचे कार्यक्रमाचे फोटो जोडुन सादर करीत आहोत.

(डॉ.महेश पाटील )
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण

प्रत माहीतीस्तव सविनय सादर
मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,
कोकण परीक्षेत्र,नवीमुंबई